INTERNATIONAL RESEARCH JOURNAL OF HUMANITIES AND INTERDISCIPLINARY STUDIES
( Peer-reviewed, Refereed, Indexed & Open Access Journal )
DOI : 03.2021-11278686 ISSN : 2582-8568 IMPACT FACTOR : 6.865 (SJIF 2023)

# शाहू महाराजांचे औद्योगिक धोरण व श्री शाहू छत्रपती मिल्सचा उदय
## (Shahu Maharaj's Industrial Policy and rise of Shri Shahu Chhatrapati Mills)

**श्री. अखिलेश व्ही. शिंदे**
सहाय्यक प्राध्यापक,
समाजशास्त्र विभाग,
महिला महाविद्यालय, कराड,
जि. सातारा (महाराष्ट्र, भारत)

**प्रा. (डॉ.) अर्चना आर. कांबळे (जगतकर)**
प्राध्यापक व विभागप्रमुख,
समाजशास्त्र विभाग,
न्यू कॉलेज, कोल्हापूर (महाराष्ट्र, भारत)

**DOI No.** 03.2021-11278686 **DOI Link ::** https://doi-ds.org/doilink/12.2023-54963688/IRJHIS2312005

***गोषवारा:***

*प्रस्तुत शोध निबंधामध्ये स्वातंत्र्यपूर्व काळातील कोल्हापूर संस्थानातील श्री. छत्रपती शाहू महाराजांच्या औद्योगिक धोरणाची अर्थनिर्वाचानात्मक पद्धतीने मांडणी करून संशोधकाने श्री. शाहू छत्रपती मिल्सच्या स्थापनेची पार्श्वभूमी स्पष्ट केलेली आहे. प्रस्तुत शोध निबंधासाठी संशोधकाने केवळ दुय्यम साधनांचा आधार घेतला आहे व प्राप्त माहितीच्या आधारे असा निष्कर्ष मांडला आहे की, शाहू महाराजांनी विकासाचा व्यापक व सर्वसमावेशक दृष्टीकोन नजरेसमोर ठेवून तत्कालीन जाती आधारित व्यवसाय, वेठबिगारी, जातीयता, आर्थिक असमानता यासारख्या अनेक प्रश्नांवर मात करण्यासठी श्री. शाहू छत्रपती मिल्सची स्थापना केली.*

***मुख्य शब्द:*** *आर्थिक असमानता, औद्योगिक धोरण, वेठबिगारी, श्री. शाहू छत्रपती मिल्स*

**प्रस्तावना:**

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर आपण खऱ्या अर्थाने लोकशाही स्थापन केली, ही लोकशाही राजकीय हक्कांवर आधारित असणारी राजकीय लोकशाही होती. या राजकीय लोकशाहीला जोपर्यंत 'सामाजिक लोकशाही' ची जोड मिळत नाही तोपर्यंत ती परिपूर्ण होऊ शकत नाही. अशा प्रकारची लोकशाही सामाजिक स्वातंत्र्य, समाजिक समता व सामाजिक न्याय या मुल्यांवर आधारित असते.

छत्रपती शाहू महाराजांनी खऱ्या अर्थाने मानवी मुल्यांवर आधारित लोकशाही प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला, हे त्यांनी केलेल्या जनकार्यातून प्रतिबिंबित होते. शाहुपुरी व्यापारपेठ, गुळाच्या बाजारपेठेची निर्मिती, शेतकऱ्यांच्या सहकारी संस्थांची स्थापना, शेतकऱ्यांना कर्जे उपलब्ध

करून देणे असे उपक्रम त्यांनी कोल्हापूर संस्थानात राबविले आणि कमालीचे यशस्वी केले. शेती, उद्योग, सहकार या क्षेत्रांत राजर्षींनी नवनवे प्रयोग केले. यासाठी त्यांनी शेतीच्या आधुनिकीकरणासाठी संशोधनाला पाठिंबा दिला. नगदी पिके व तंत्रज्ञानाचा वापर वाढण्यासाठी व शेतकी तंत्रज्ञानाच्या संशोधनासाठी 'किंग एडवर्ड ॲग्रिकल्चरल इन्स्टिट्यूट' इत्यादी संस्था कोल्हापुरात स्थापण्यात त्यांचा प्रमुख वाटा होता. शेतकऱ्यांना कर्जे उपलब्ध करून देणे, शेतीमध्ये नवीन तंत्रज्ञान, संशोधन अशा उपक्रमांतूनही त्यांनी कृषिविकासाकडे लक्ष पुरवले. राजांनी त्याकाळी उद्योग, शेती व जनजीवनासाठीचे पाण्याचे महत्त्व लक्षात घेऊन भविष्यात रयतेला दुष्काळाला सामोरे जावे लागणार नाही यासाठी राधानगरी नावाचे धरण बांधले. शेती व्यवसायाला जोडधंदे म्हणून नवनवीन उद्योगधंदे सुरु करून या उद्योगधंद्यांना सहकारी तत्वाची जोड दिली. श्री. छत्रपती शाहू महाराजांच्या औद्योगिक धोरणाचा दीर्घकालीन परिणाम कोल्हापूरच्या विकासावर पडला व कोल्हापूर संस्थानाला उद्योगाच्या दृष्टीने वेगळे महत्व प्राप्त झाले. रयतेच्या सर्वांगीण विकासामधून लोकशाहीची मुल्ये साकारणारा राजा म्हणून श्री. छत्रपती शाहू महाराजांचा उल्लेख करावा लागेल.

**संशोधनाची उदिष्टे:**

- श्री. छत्रपती शाहू महाराजांच्या औद्योगिक धोरणाची व्याप्ती जाणून घेणे
- श्री. छत्रपती शाहू महाराजांच्या औद्योगिक धोरणाच्या माध्यमातून श्री. शाहू छत्रपती मिल्सच्या स्थापनेची पार्श्वभूमी जाणून घेणे ही प्रमुख उदिष्टे प्रस्तुत शोध निबंधासाठी निश्चित करण्यात आलेली आहेत.

**संशोधन आराखडा:**

प्रस्तुत शोध निबंधासाठी वर्णनात्मक संशोधन आराखड्याचा आधार घेण्यात आलेला आहे. प्रस्तुत शोध निबंध प्रामुख्याने दुय्यम माहिती स्त्रोतांवर आधारित आहे, यामुळे संशोधकाने उपलब्ध माहितीचे अर्थनिर्वचन करून त्या माहितीची वर्णनात्मक स्वरुपाची मांडणी केलेली आहे.

**राजर्षी छत्रपती शाहू महाराजांचे औद्योगिक धोरण:**

"शंभर वर्षापूर्वी आपला देश हा कृषिप्रधान देश होता आणि आजही आधुनिक उद्योगधंद्यांचा विकास होवूनही तो कृशिप्रधानच समजला जातो. याचे कारण आजही बहुसंख्य लोकांचा व्यवसाय शेती हाच आहे. शेती हा आपल्या अर्थव्यवस्थेचा कणा आहे तेंव्हा शेतीचा उद्धार म्हणजे शेतकऱ्यांचा उद्धार, पर्यायाने देशाचा उद्धार हे सूत्र लक्षात घेवून राजर्षी शाहू छत्रपतींनी आपल्या संस्थानात शेतीसाठी मुलभूत सुधारणा केल्या."[१] भारत देश हा प्रामुख्याने शेतीप्रधान असल्यामुळे भारतातील बहुतांशी उद्योग शेतीवरच अवलंबून आहेत. त्यामुळे शाहू महाराजांच्या औद्योगिक धोरणाचा पाया शेतीसाठी केलेल्या सुधारणांमध्ये आढळून येतो.

"छत्रपती शाहू महाराजांनी आपल्या कारकिर्दीत सामाजिक, राजकीय, प्रशासकीय व शैक्षणिक सुधारणेबरोबरच आर्थिक सुधारणा घडवून आणल्या. कृषी विकासातून शेतमाल उत्पन्नवाढ,

शेतमालावर आधारीत उद्योगधंदे व व्यवसायाची निर्मिती, त्यातून आर्थिक विकास असा शाहू महाराजांचा दृष्टीकोन होता. त्यासाठी त्यांनी आपल्या धोरणात शेती, सहकार, उद्योग, व्यापार आणि दळणवळण यांना प्राधान्य दिले. शेतीला पाणीपुरवठा करण्यासाठी विहीर, तलाव, बंधारे बांधण्यास प्रोत्साहन दिले."[२] शेतीसाठी जलसिंचनाची सोय व्हावी म्हणून तळी व तलावाची निर्मिती केली. इ. स. १९०८ मध्ये राधानगरी धरण बांधण्यास सुरूवात केली. भोगावती नदीवर राधानगरी धरण बांधून शेती सिंचनाची सोय केली. इ. स. १९२० साली कोल्हापूरला स्वतंत्र शेती संस्था स्थापन केली. संस्थानातील अनेक नद्यांवर विविध ठिकाणी बांध घातले. कृषी प्रदर्शन भरवून आधुनिक शेती अवजारे, बी-बियाणे, खताचा वापर याविषयी माहिती करून दिले. शेतीचे उत्पादन वाढविण्यासाठी या भागात पीक लागवडीचे अनेक प्रयोग, नवीन पीक पद्धती आणि नवनवीन शेती अवजारे निर्माण करण्यासाठी प्रोत्साहन दिले. सन १८९६-९७ आणि १९१८-१९ या वर्षी मोठ्या प्रमाणात दुष्काळ पडला. या दुष्काळ निवारणासाठी अनेक उपाययोजना शाहू महाराजांनी केल्या.

आधुनिक शेती, शेतकन्यांना कर्ज पुरवठा, अवजारांचे मुझियम, शेतकी प्रदर्शन, खास कृषी अधिकारांची नेमणूक शेती संस्था या माध्यमातून उत्पादन वाढीस प्रोत्साहन दिले. इ. स. १९१२ साली सहकार विषयक कायदा मंजूर करून सहकारी संस्था व उद्योग यांचा पाया उभारला. कृषी व उद्योग यांची प्रगती करुन आर्थिक भरभराट साधायची असेल त्याला व्यापाराची जोड दिली पाहिजे हे छत्रपती शाहू महाराजांनी ओळखले होते. शाहूपुरी व जयसिंगपूर अशा अनेक ठिकाणी व्यापारी वसाहती व पेठा स्थापन करुन व्यापाराला उत्तेजन दिले. कोल्हापूर, कागल, निपाणी येतील व्यापारी लोकांना खास सवलती देवून व्यापार सुरु करण्यास, वखारी घाल्यास प्रोत्साहन दिले. यामधूनच उदयास आलेली कोल्हापूर ही गुळाची सर्वात मोठी बाजारपेठ म्हणून ओळखली जाते.

छत्रपती शाहू महाराजांनी कोल्हापूर संस्थानात शेती, उद्योगधंदे, सहकार आणि व्यापार या क्षेत्रात मोठ्या प्रमाणात कार्य केले. "प्रत्येक क्षेत्रातील प्रगती ही नियोजनबद्ध असायला हवी असे महाराजांना वाटत असे. म्हणूनच त्यांनी आपल्या संस्थानात औद्योगिक सर्वेक्षण करून, उपलब्ध साधन संपत्तीच्या जोरावर कोणकोणते नवे उद्योगधंदे सुरु करता येतील याचा अंदाज घेवून स्वतः अनेक अनेक उद्योग सुरु केले. १९०५ पर्यंत कोल्हापूर संस्थानात सुगंधित औषधी तेल उद्योग, मधुमक्षिका पालन उद्योग, काष्ठर्क उद्योग आणि सुती कापड उद्योग सुरु केले. यासाठी देशाच्या विविध भागात आपली माणसे त्या त्या उद्योगाचे प्रशिक्षण घेण्यासठी पाठविली व बाहेरची प्रशिक्षित माणसे आपल्या संस्थानात अधिकारपदी नेमली."[३] करमुक्त नोंदणी, मोफत जमिनी, पेटंटचे हक्क, देणगी अशा अनेक सवलती शाहू महाराजांनी दिल्याने कोल्हापूरच्या शाहूपुरीत तसेच इतर तालुक्यांच्या गावी तेलगिरण्या, कागदनिर्मिती, पिठगिरण्या, मुद्रण साहित्याचे कारखाने असे अनेक लहान मोठे उद्योग उभे राहिले. औद्योगिक प्रदर्शनाचेदेखील जाणीवपूर्वक आयोजन महाराजांकडून केले जात होते. आपल्या संस्थानातील शिरोळ, इचलकरंजी आणि गडहिंग्लज या भागात जिनिंग

फॅक्टरी स्थापन करण्यास प्रोत्साहन दिले. याशिवाय कोल्हापूर संस्थानात उद्योग व्यवसायासाठी हातभार लावला. सहकाराची मुहुर्त मेढ १९९२ रोजी रोवली. शाहूपुरी, जयसिंगपूरी, राधानगरी, शाहूवाडी, गडहिंगलज या ठिकाणी नव्याने वसाहती निर्माण करून व्यापाराला प्रोत्साहन दिले. या शाहू महाराजांच्या प्रयत्नांमधून कोल्हापूर संस्थानात अनेक व्यवसाय व उद्योगधंदे सुरु आले.

**श्री. शाहू छत्रपती मिल्सची स्थापना:**

कोल्हापूर राज्य प्राकृतिक संसाधनांच्या दृष्टीने समृद्ध असल्यामुळे कोल्हापूर राज्यात अनेक उद्योग होते. यामध्ये  चांदी, सुवर्णकार, गवंडी, मातीची भांडी, बांगड्यांचे उत्पादन, चामड्याचे विणकाम, घाण्याच्या माध्यमातून तेल काढणे, कागद निर्मिती, सुगंधी द्रव्ये निर्मिती, साखरेचे उत्पादन हे कोल्हापूर राज्यातील त्या काळचे काही प्रमुख उद्योग होते. परंतु कापड निर्मिती करणारा एकही उद्योग त्याकाळात मुंबई शिवाय कोठेही स्थापित झाला नव्हता. परंतु कोल्हापूर जिल्ह्यामध्ये कापसाचे पिक घेतले जात नसूनसुद्धा शाहू महाराजांनी शाहू मिल्स स्थापनेचे धाडस दाखवले. कारण शाहू महाराजांची शाहू मिल्स स्थापनेमागील भूमिका व्यापक स्वरुपाची होती.

"कोनशिला समारंभाच्या वेळी शाहूंचे भाषण दिवाण सबनीस यांनी वाचून दाखविले. त्या भाषणात म्हटले होते की, आपल्या राज्यातील ही पहिलीच कापड गिरणी असल्यामुळे आपण तिला जास्तीत जास्त सहानुभूती दाखवू व साहाय्य करू. ह्या औद्योगिक साहसात चालकांना आपली सहानुभूती आहे. तसेच हा धंदा गिरण्यांचे मोठे मालक व लक्षाधीश यांच्या हाती जाऊ नये, असा जो शेतकऱ्यांनी निर्धारी विचार केलेला आहे त्याच्याशी आपण सहमत आहोत. गिरणीच्या भागधारकांचे कायमचे हित व्हावे, अशी चालकांनी खबरदारी घ्यावी आणि असले उद्योगधंदे ही केवळ मुंबईचीच मक्तेदारी नसून आपल्याही ठायी व्यापारबुद्धी आहे, हे या कामी यश मिळवून त्यांनी सिद्ध करावे. आज दसरा असल्यामुळे लोकांनी, औद्योगिक सीमोलंघन करून वैभव मिळविण्याच्या निर्धाराने बाहेर पडावे. एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे ती ही की, शांतता काळातील विजय युद्धातील विजयापेक्षा सुकीर्ती पावतात. आपणास उदासीनता, अज्ञान आणि दारिद्र्य ह्यांवर विजय मिळवावयाचा आहे."[४] या शाहू महाराजांच्या भाषणातून श्री. छत्रपती शाहू मिल्सची स्थापना करण्यामागे शाहू महाराजांची दूरदृष्टी होती हे अगदी स्पष्ट होते. शाहू मिल्स केवळ उत्पनाद करणारा घटक नव्हता तर त्यामागे शाहू महाराजांच्या आर्थिक, समाजिक विकासाचा व्यापक दृष्टीकोन दडलेला होता. या मिल्सच्या माध्यमातून शाहू महाराजांनी कोल्हापूर राज्य व सामाजिक बंधनात अडकलेल्या तेथील जनतेच्या उन्नतीसाठी केलेला एक परिणामकारक प्रयत्न होता.

"१९०६ साली कोल्हापुरात, 'शाहू छत्रपती मिल्स' या कापड गिरणीची स्थापना करण्यात आली. या मागे शाहू महाराजांचीच प्रेरणा होती. कोल्हापूर संस्थानचा, उद्योगधंद्याच्या क्षेत्रातील हा सर्वांत मोठा प्रकल्प होता. अशा प्रकारचे मोठमोठे उद्योग कोल्हापुरात स्थापन झाले पाहिजेत, हा निश्चय त्यांनी युरोपच्या दौऱ्यावर असतानाच केला होता आणि तो या गिरणीच्या रूपाने साकार

झाला. या गिरणीच्या उभारणीसाठी विस्तीर्ण जागा, शेजारचे पाण्याचे तळे आणि ५० हजार रुपयांचे भांडवल महाराजांनी दिले. या उद्योगामुळे कोल्हापुरातील शेकडो लोकांना रोजगार उपलब्ध झाला. इतकेच नव्हे, तर कोल्हापूर हे हिंदुस्थानच्या कापड उद्योगाच्या नकाशावर ठळकपणे दिसू लागले. २७ सप्टेंबर १९०६ रोजी, दसऱ्याच्या शुभ मुहूर्तावर, या गिरणीचे उद्घाटन महाराजांच्या हस्ते झाले. या उद्योगाला आपले पूर्ण सहकार्य राहील, अशी ग्वाही देत असताना महाराज या प्रसंगी म्हणाले होते. "कोणत्याही परिस्थितीत हा चालू केलेला उद्योग, बड्या गिरणी मालकांच्या अथवा धनिकांच्या ताब्यात जाणार नाही, यासाठी कोल्हापूरच्या लोकांनी दक्ष राहिले पाहिजे आणि या उद्योगात असे यश संपादन केले पाहिजे की, जगाला हे समजून चुकायला हवे की, व्यापार तंत्रातील कौशल्य, हे काही केवळ मुंबईचीच मक्तेदारी आहे, असे नाही. (Mercantile talents are not a monopoly of Bombay alone!)"[५]

"पूर्वी काही ब्राह्मणांनी उद्योगधंद्याच्या क्षेत्रात धाडशी पाऊल टाकण्याचा प्रयोग केला होता. तथापि उद्योगधंद्याचे अपुरे ज्ञान आणि उद्योग चालविण्याच्या कलेचे अज्ञान यामुळे तो प्रयोग सपशेल फसला होता. नेहमीच्या रिवाजाप्रमाणे शाहूंनी याही गिरणीच्या बाबतीत सावध पावले टाकली. त्यांनी एकदम ही कापड गिरणी काही सरकारी मालकीची केली नाही. प्रारंभी तिची उभारणी सार्वजनिक क्षेत्रातच केली. संयुक्त भांडवलावर ही गिरणी एक वर्षभर चालली. खंडेराव गायकवाड हे तिचे पहिले कार्यवाह होते आणि तेच गिरणीचे सरव्यवस्थापक होते. म्हणावी तशी व्यवस्थितपणे गिरणी चालली नाही. शाहू डगमगले नाहीत. त्यांनी ती गिरणी भागधारकांची केली. तरीही गिरणी अशीतशीच चालू लागली. मग मात्र गिरणी दरबारने आपल्या ताब्यात घेतली, पुरेसे भांडवल व उत्तम व्यवस्थापन करून ही कापड गिरणी उजगऱ्याला आणली."[६]

अखेर शाहू महाराजांनी दिनांक २७ सप्टेंबर १९०६ रोजी 'श्री शाहू छत्रपती स्पिनिंग अँड वीव्हिंग मिल' ची कोनशिला स्वहस्ते बसविली. एका राजाने प्रजेच्या हितासाठी शेतमालावर आधारित अशा एका उद्योगाची उभारणी करून अक्षरशः सीमोल्लंघन केले. 'शाहू मिल' ही भारतातील सरकारी क्षेत्रातील पहिला उद्योग व पहिली गिरणी होय. यावरून शाहू महाराजांची भेदभावमुक्त सहकारी तत्वावरील निष्ठा अधोरेखित होताना दिसते.

**चर्चा आणि निष्कर्ष:**

श्री. शाहू छत्रपती मिल हा एकमेव उद्योग होता ज्यात अत्यंत योग्य प्रमाणात गुंतवणूक होत होती. राजर्षींच्या आधी कोल्हापुरात वस्त्रोद्योगात मोठी गुंतवणूक होती पण ती कुटीर उद्योगाच्या स्वरूपात होती आणि उत्पादन पारंपारिक पद्धतीने होत असे. राजर्षी शाहू छत्रपतींच्या विचार आणि धोरणांमुळे कोल्हापूरचे आधुनिकीकरण, औद्योगिकीकरण तसेच वस्त्रोद्योगाला चालना मिळाली. अशा प्रकारचे विविध प्रयत्न करून व संधी देऊन त्यांनी राज्यात विविध धोरणे लागू केलीत व त्या धोरणांच्या माध्यमातून राजर्षी शाहूंनी वस्त्रोद्योगावर पकड निर्माण करण्याचा प्रयत्न केला.

अशा प्रकारे शाहू महाराजांनी विकासाचा व्यापक व सर्वसमावेशक दृष्टीकोन नजरेसमोर

ठेवून तत्कालीन जाती आधारित व्यवसाय, वेठबिगारी, जातीयता, आर्थिक असमानता यासारख्या अनेक प्रश्नांवर शाहू मिलच्या माध्यमातून मात करण्याचा प्रयत्न केला व समर्थपणे पार पडला.

**संदर्भ सूची:**


१) पवार, जयसिंगराव, 'राजर्षीशाहू छत्रपती, जीवन व कार्य', (२०१४), पृ. क्र. १४१

२) कित्त, पृ. क्र. १६३

३) पवार, जयसिंगराव, (२०१४), 'राजर्षीशाहू छत्रपती, जीवन व कार्य', पृ. क्र. १४४-१४५

४) सूर्यवंशी, कृ. गो., (१९८४), 'राजर्षी शाहू, राजा व माणूस', पृ. क्र. ६३६

५) पवार, जयसिंगराव, (२०१४), 'राजर्षीशाहू छत्रपती, जीवन व कार्य', पृ. क्र. १४६

६) सूर्यवंशी, कृ. गो., (१९८४), 'राजर्षी शाहू, राजा व माणूस', पृ. क्र. ६३६